"श्री त्र्यंबकेश्वराय नम:"

श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथिल उपाध्याय

भ्रमणदुरध्वनी = ९४२२२६८५९६ **भूषण सांभ शिखरे**(*ज्योतिष पंडित*)

**FAX = (०२५९४)२३३६४६** **ग्रहसंकेत ज्योतिष कार्यालय**(*कृष्णमूर्ती सिध्दातावर आधारित*)

पत्ता = ४१७"**ग्रहसंकेत**",सत्यनारायण मंदिरा जवळ,मु.पो.ता. त्र्यंबकेश्वर. जि,नाशिक-- ४२२२१२ महाराष्ट्र

---

(०२५९४)२३३०१४ फोनची वेळ= दुपारी २ ते ५ फक्त,व रात्री ८ ते १० फक्त,भेटण्याची वेळ दुपारी २ ते ५ फक्त

---

www.shikharebs.com & email = shikharebs@rediffmail.com & bhushanshikhare@gmail.com

---

ज्योतिष अथवा धार्मिक सल्ल्यासाठी पूर्व सुचना देऊनच भेटण्याच्या वेळेतच भेट घ्यावी.शक्यतो फोन करूनच यावे.

---

## वाचकासाठी प्रमुख काही सुचना

**स**प्रेम नमस्कार.हा लेख जरा शुध्द मराठीत असुन जर आपण वाचन मूळ पासुन शेवट पर्यत शांततेने व घाई न करीता वाचलातर ह्या लेखाद्वारे आम्हाला खरे काय सांगायचे आहे हे व्यवस्थित समजेस. आपला अभिप्राय जरुर कळवावा.

## ~~~~~गोदा कुशावर्तयात्रा वाद विवादनिर्णय सुधा~~~~~

**ह्या** आपल्या सर्व भरतखंडात म्हणजे हिंदुस्थान देशांत हिमालयपर्वतापासून तहत रामेश्वरापर्यत अनादी कालापासुन मुख्यत्वें वैदिक धर्म(*आर्यधर्म*) प्रवृत्त राहुन आर्य लोकांचे बुध्दिवैभवाने व शौर्याने त्या धर्मांतील भूतदया, विज्ञानमार्ग,अहिंसा,नैसर्गिकनीति,दया,शांति,परोपकारबुध्दि,दातृत्व,कौशल्य व कृतज्ञता वगैरे प्राणिमात्रांच्या जीवनास अनिंद्य मार्गांनी ऐहीक व पारत्रिक जी सुखोत्पादक मूलतत्वे त्यांचे योगाने सर्व जगत्-भर ग्राह्य होऊन तो पसरला असावा,असे हल्ली जे इतर राष्ट्रांत नव-नविन शोध लागत आहेत,त्यात मूर्ति व देवालये(*शंकरादी देवांची*)सापडता-त,त्यावरून ह्या धर्मांत सगुणोपासनेचा अभ्यास करून मग निर्गुण परब्रह्माची उपासना करण्यास सुलभ जाऊन त्याची प्राप्ति होते असे एक तत्व आहे,तीचमूर्ती-पुजा होय. म्हणजे ज्या परमेश्वरानें आपणांस पंचत्वांचे रूपाने निर्माण केले आहे त्या पंचतत्वांची रूचिवैचित्र्याप्रमाणे अलौकिक मूर्ति बनवून तिचे ठायी ईश्वराची भावना करून त्याचे(*ईश्वराचे*) आपणावर झालेले उपकारांबद्दल आपलेसारखे सुखोपभोगाच्या वस्तु समर्पण करून कृतज्ञता दाखविणे यास "**पूजन**" असे म्हणतात किंवा "**सगुणोपास्ति**" असेही म्हणतात. तात्पर्य--हीच तत्वे प्राचिनकाळी सर्व जगत्-भर चालु होती,असे अनुमान उत्पन्न होत आहे. आर्यलोक ईश्वराचे "**अस्तित्ववादी**" असल्याने **कृत**,**त्रेता**,**व्दापर** या तीन युगांत **श्रुति** व **स्मृति** यांस अनुसरून चातुर्वर्ण्यापैकी **ब्राम्हण**,**क्षत्रिय** ,**वैश्य** ह्या व्दिजसंज्ञक तीन वर्णांचा धर्म कृतयुगांत परमेश्वराचे ध्यान, त्रेतायुगात तत्संबंधाने त्याने निर्माण केलेले अलौकिक व महत्तेजस्वी तत्व जे "**अग्नि**" तव्दाराने यजन(*यज्ञ यागादि कर्मे*)व व्दापारयुगात वर सांगितल्याप्रमाणे सगुणोपास्ति यथाविधी पूजन ब्राम्हणांकडे ज्ञानोपदेश, क्षत्रियांकडे यथाविधी जगाचे संरक्षण व वैश्याकडे वाणिज्यादि व्यवहार अशी विभागरूपाने कर्तव्य कर्मे होती. शूद्रांस ब्राम्हणादि वर्णत्रयांची सेवा करणे असे होते,परंतु व्दापाराचे शेवटी व कलियुगाचे आरंभास पुराणोक्त धर्माचे प्राबल्य वृध्दिगत होऊन प्रथमचे तीन वर्णांनी आपापली कर्मे श्रुति व स्मृतिस अनुसरून करून वेदरूप वाणीने व चवथे वर्णाचे जे शुद्र त्यांनी पुराणोक्त वाणीने भक्तिरूप धर्म म्हणुन परमेश्वराचे नामस्मरण करावे,असे चातुर्वर्णांस साधारण म्हणुनच भक्तिरूपाचे एक तत्व उत्पन्न झाले असावे,असे भारत व भागवत या दोन पुराणांचा मेळ घालून पाहिले असतां दिसुन येते. असो. या धर्मातील तत्वांपैकी कृतज्ञता हे एक तत्व आहे असे वर आधि सांगितलेच आहे. ज्या परमेश्वराने **पृथ्वि आप** ,**तेज**,**वायु** व **आकाश** ही पंचतत्वे निर्माण करून त्यांचे योगाने हीसर्व स्थावरजंगमात्मक सृष्टि निर्माण केली आहे. त्या परमेश्वराविषयी व त्या पंच-तत्वांविषयी केवळ पशुवत् उदरपूर्तीचाच उद्योग न करिता ज्ञानवान प्राणि जो मनुष्य ह्याने आपले ठिकाणी कृतज्ञताबुध्दि धरली असता त्यास ऐहिक सुखे प्राप्त होऊन पारलौकिक सुख असा जो मोक्ष म्हणजे जन्ममरणसंसृतीचा वियोग त्याचीही प्राप्ति होते असे पुढे जे विषयोपपादन करणार त्यावरून स्पष्ट दिसुन येईल. वर जशी अग्निरूप तत्वांची उपासना सांगितली तसेच दुसरे तत्व आप(*उदक*)देवता ज्या तत्वास प्राणिमात्रांचे जीवन अशी संज्ञा आहे. त्या देवतेचे महत्व व गुण यांचा विचार करून वेदांत व विशेषेकरून पुराणात देवतेसंबंधाने

कृतज्ञता दाखविण्याचे चातुर्वर्ण्यासही सर्व साधारण मार्ग सांगुन फलही सांगीतलेले आहे,ते असे--

**हे गंगे**, हे **यमुने**, हे **सरस्वति** व हे क्षिग्र गमन करणारे म्हणुन "**शुतुद्रि**" व जिला "**वेरावती**" म्हणतात व जी वक्रगतीने वाहणारी व जी तेज:पुंज म्हणुन "**परूष्णि**" म्हणतात,असे परूष्णेसह नद्या हो तुम्ही आमचे या स्तोत्राकडे लक्ष द्यावेत म्हणजे आमचे स्तवनरूप सेवेचा स्वीकार करावा. तसेच जिचा वर्ण कृष्ण आहे,म्हणुन जिला "**असिन्कि**" म्हणतात. तीच्याशी सहवर्तमान जी तु वायुचे योगाने पापंचे क्षालन करणारी आहेस म्हणजे तुजवरिल वारा अंगास लागल्याबरोबर पाप दुर होते. असे "**मरूद्वुधे**" व सरलगतीने वाहणारी आहेस,म्हणुन "**आर्जीकीये**" जीचे पात्र विस्तृत आहे,म्हणुन वितस्ता व सुंदर उदकांनी भरून वाहणारी म्हणुन "**सुषोमा**" ह्यांशी सहवर्तमान व जी तु मोक्षाची इच्छा करणारे जे **वसिष्ठ ऋषि** त्यांचे भवपाश दूर केलेस,म्हणुन तुला "**विताट्**" म्हणतात,ती तु हे जे आम्ही स्तवन करितो ते श्रवण कर. असे ऋषिंनी मंत्रात व **यास्काचार्यांनी** आपले निरूक्त ग्रंथांत निर्वचन रूपाने वर्णन केलेले आहे,ते असे--

**ज्या** ठिकाणी सिताऽसिता म्हणजे गंगा व यमुना ह्या दोन्ही नद्यांचा संगम झाला आहे असे जे प्रयागतीर्थ ज्याला "**वेणी**" अशी संज्ञा आहे. तेथे हे बुध हो जी कोणी मनुष्ये यथाविधी स्नान करीतात. त्यास स्वर्गप्राप्ति होते. इतकेच नाही तर,तेथे त्यांचे देहावसन झाले म्हणजे त्यांना मोक्षप्राप्तिही होते. तात्पर्य-आपोदेवात्मक ज्या गंगादि पुण्यनद्या त्यांचे स्तवन व यथाविधी स्नान यांचे फल मोक्षपदापर्यंत जाऊन पोहोचल्याचे वर्णन वेदांत दिले आहे. तसेच "**भारत**" व "**मत्स्यपुराणांत**" ही

*यो दरिद्रैरपि विधी: शक्य: प्राप्तुं जनेश्वर । तुल्यो यज्ञफलै: पुण्यैस्तं निबोध महीपते ।।*
*ऋषिणां परमं गुह्यमिदं भारतसत्तम । तीर्थभिगमनं पुण्यं यज्ञैरपि विशीष्यते ।।*

**अर्थ**--हे राजा ह्या कलियुगात चातुर्वर्णांस सर्वसाधारण परमेश्वरप्राप्तिचा मार्ग अतिशय द्रव्य,अत्यंत शरीरकष्ट व अप्रतिम विद्वत्ता यांचे साहाय्याने फलप्राप्ति करून देणारी जी पूर्वकालिन यज्ञयागादिक कर्मे त्यांच्या तो बरोबरीचा काय? परंतु त्यांचेपेक्षांही विशेष फलदायक व सुगमतर असा तीर्थाभिगमन(*तीर्थयात्रा करणे*) हा आहे. असे सांगितले आहे. स्कंदपुराणांतही श्वेतराजा,चंद्रसेन भूपति व विष्णुदत्त वैश्य वगैरे यांस मोक्षप्राप्ति झाल्याची कहाणी आहेत. पुढे श्रुति,स्मृति व पुराणे ह्यास अनुसरूनच **हेमाद्री**,**माधव** व **निर्णयसिंधु** आदि निबंधात व महामीमांसकाचार्य नारायणभट्ट यांचे "**त्रिस्थलीसेतु**","**तीर्थेंदुशेखर**" व "**तीर्थदर्पण**" वगैरे ग्रंथांत तीर्थे यांची माहात्म्ये व यात्राविधी सांगितले असून **कौस्तुभ, प्रयोगपारिजात, नारायणभट्टी, विश्वनाथभट्टी, महेश्वरभट्टी, गोपिनाथभट्टी** व **संस्कारभास्कर** वगैरे याज्ञिकीग्रंथात तीर्थयात्राविधीचे पांक्त करणिय प्रयोग दिलेले आहेत. तेव्हा हा खटाटोप करण्याचे प्रयोजन तरी काय? असा प्रश्न उत्पन्न होतो. याकरिता प्रस्तुत विषयाकडे वळु. त्यांचे उत्तर असे आहे की,पूर्वी वेदमंत्रात गंगानदी आली आहे,तिचे दोन प्रकारचें स्वरूप आहे. विंध्याद्रीचे दक्षिणभागी जी गंगा तिला गौतमि अथवा गोदा असे म्हणतात. ती ब्रम्ह,विष्णु व शिवात्मक म्हणजे त्रिदैवत आहे व ती ब्राम्हणाने म्हणजे गौतम महर्षींनी आपले तप:सामर्थाने शंकरास प्रसन्न करून घेऊन स्वत:चे व प्राणिमात्रांचे पाप दूर करणार्थ कृतयुगात या भूतलावर श्रीक्षेत्र **त्र्यंबकेश्वर** येथे पुण्यपावन तीर्थराज जे श्रीमत्-कुशावर्ततीर्थ यांत आणुन ते पुनित झाले. विध्याद्रीचे उत्तरभागी भगिरथ राजाने जी गंगा आणिली तिला भागिरथी असे म्हणतात. स्कांद व ब्राम्हपुराणांत तशाच कथा आहे ती अशी--

*कृते लक्षव्दयातीते मांधातरि शके सति । कूर्मे चैवावतारे च सिंहस्थे च बृहस्पतौ ।।*
*माघशुक्लदशम्याम् च मध्यान्हे सौम्यवासरे । गंगा समागता भूमौ गौतमप्रार्थिता सति ।।*
*महापापादियुक्तांनाम् जनानाम् पावनायच् । औदुंबरतरोर्मूले ययौ प्रत्यक्षताम तदा ।।*

**त**सेच गौतम कृतार्थ झाले असे समजुन गोदावरी अंतर्धान पावल्यावर सर्व ऋषि व मुनिगण जगताला पावनकर्त्री ही ह्या भूतलावरून निघुन गेल्याने आत्ताच्या लोकांचे पापांचे क्षालन कसे होईल अशी त्यांस काळजी पडुन गौतमांची त्यांनी प्रार्थना केली,त्यावरून गौतमांनी गोदावरीची पुन्हा स्तुति करून ती "**कुशावर्ततीर्थांत**" प्रकट झाली त्यासंबंधाने "**स्कांद**" पुराणातील आणखीन एक आधार देत आहे तो असा--

*गुप्ता तलांतरेणैव गोदा सा त्रपयान्विता । तामालोक्य मुनिम् प्राह सोम: सोमार्धशेखर: ।।*
*मुने तनुकुशाग्रेण भूमौ द्रक्ष्यसि गौतमी । कुशेनावर्तिता मंत्रैश्चिद्रसा मुनिना यत: ।।*
*कुशावर्तमिती ख्यातम् तीर्थंतत्रातिपावन् । तत्र द्दष्टा महागंगांप्रकटाम् परमेश्वरी ।।*
*तस्यां स्नात्वाऽति संतुष्टा देवासुरमुनीश्वरा: । मुने कुशं समादाय इत आह्वानयस्व भो ।।*

*तथा चक्रे स हि मुनिस्ततः प्रादुर्बभूव सा । कुशावर्तं ततस्तीर्थं देवानामपि दुर्लभम् ।।*

असे सर्व गोदावरीमध्ये अतिपावन व पुनरूत्पत्तिस्थानभूत **कुशावर्त तीर्थ** आहे. ब्रम्हपुराणांत **ब्रम्हदेव** व **नारद** यांचे संवादांत असे आहे की,

*महेश्वरजटा स्थाया आपो देव्यो महामते ।तासां च व्दिविधो भेद आहर्तुः पद कारणात् ।।*
*एकोंशो ब्राम्हणे-नात्र व्रतदानसमाधिना । गौतमेन शिवं पूज्य आन्हतो लोकविश्रुतः ।।*
*अपरस्तु महाप्राज्ञ क्षत्रियेण बलियसा । आराध्य शंकरं देवं तपोभिर्नियमैस्तथा ।।*
*भगीरथेन भूपेन आन्हतोंशोऽपरस्तथा । ए वम् व्दैविध्यमभवद्गंगाया गां गता यतः ।।*

**या**वरून स्कंद व ब्रम्ह पुराणाचे आधारें **गोदा** व **भागिरथी** या दोन्हीही नद्या गंगापदव्याच्य असुन एकरूप आहेत व गोदेंत तर विशिष्ठस्थलाधिकरणक अतिपावन व गोदा मूलस्नानभूत व मुख्य असे "**कुशावर्ततीर्थ**" आहे.या करिता गोदायात्रा निमित्ताने यात्रा करणे पुढिल प्रतिपादनावरून सिध्द होत आहे. भागिरथसंबंधाने प्रयाग,काशि व गया या त्रिस्थलीसंबंधाने तीन स्थलांशी जोडुन यात्रा असतांनाही यात्राक्रमाचा घोटाळा न करता त्रिस्थलीसेतुकारानें यथा-तथ्य विवेचन केले आहे. परंतु गंगापदवाच्य जी दुसरी गौतमी जिला वृध्दगोदा अशी संज्ञा आहे. तिच्या यात्रेसंबंधाने आधुनिक ग्रंथकार "**गोदाविवेकादर्श**" व "**गोदानिर्णयचंद्रिका**" कार यांनी यात्राक्रम विशेष तीर्थांचे माहात्म प्राचिन शास्त्राधार व त्यास धरून अलौकिकाविगीत शिष्टाचार व रूढि यांचे संबंधाने अनेक विषयांत स्पर्धा व चर्चा करून आमचे सारखे लोकांत घोटाळ्यात घातले आहे. त्यात गोदानिर्णयचंद्रिकाकार हे वैय्याकरण व बहुश्रुत असल्याने त्यांनी तर परंपरागत शास्त्राधार यांचे भलतेसेच अर्थ करून नैसर्गिक,न्यायसिध्द, व प्रति-पदोक्त विशिष्टाधिकरणक तीर्थ-माहात्म व तत्संबंधी यात्राविधी याबद्दल काहीतरी स्वकपोलकल्पित हेतु व त्यांचे पुष्टीकरणार्थ लागु नसणारे धर्मशास्त्र न जाणनारे जुने व अभिनव पूर्व परस्परविरोधी आधार देऊन शास्त्रानुसार चालत आलेले रूढीचा अनादर किंवा अवहेलना करून सामान्य जणांवर(*धर्मशास्त्राबाबत अनभिज्ञ जणांवर*) आपले अपु-या विद्वत्तेचा व अल्पबुध्दि-पणाचा अतिबहुश्रुतपणाने कोटीक्रम करून अल्पबुध्दिचा पगडा बसविण्याचा प्रयत्न काही "**नाशिक**" स्थित अल्पबुध्दि जिवीधाकर आपले पांडित्य दाखवुन करू पहात आहेत. म्हणुनच अलीकडे आधुनिक ग्रंथकारांच्या ग्रंथांचे मान्यतेबद्दल विद्वांन लोकांच्या संमति घेण्याची चाल पडली आहे. त्याप्रमाणे या ग्रंथकारांचे विद्वत्तेचा विचार केला असता यांचे ग्रंथातील गुणावगुण पाहुन मान्यता (*सर्टिफिकीट*) देण्याचा ज्यांस अधिकार या ग्रंथकाराचे विद्वत्तेचे मानाने नाही असे जे बहुतेक **नाशिकस्थ** वृत्त्युपजीवी व ज्यांचे या ग्रंथरचनेपासुन निवळ हित आहे. त्यांनींच केवळ ह्या ग्रंथाचे आरंभी आपली संमती निदर्शित केल्याचे दिसत आहे. खरोखरच विचार केला असतां अशा विद्वान व कोटीक्रम करून लिहीणारेग्रंथकाराचे परिश्रमाबद्दल व ह्या ग्रंथाचे गुणावगुणांबद्दल ह्या ग्रंथसंबंधाने का बरे आमच्या सारख्यांनी मूक अगर बधिर होऊन बसावे ? तेव्हा ह्याबद्दल सुज्ञ व मर्मज्ञ लोकच आता स्वतःच विचार करतील.

**स**दरचे दोन ग्रंथकारांचे(*खरे व खोटे*) मतभेदाचा निर्णय पुराणे व स्मृत्या यांस अनुसरून जे प्राचिन निबंध व अर्वाचीन धर्मशास्त्रीय ग्रंथ यांचे आधाराने दोहोतहि खरे काय आहे याविषयी प्रसंगानुसार विषयोपादन करून चार ओळी विव्दज्जांपुढे ठेवुन त्यांचा त्यांनीच निःपक्षपाताने विचार करावा इतकाच ह्या लेखाचा मुळ खरा हेतु आहे. वादांचे विषयांचे जागी दोन्हीही ग्रंथकारांचे प्रतिक घेऊन त्या विरूध्द शास्त्राधार देऊनच बरीच चर्चा करणे ख-याची बाजु धरणा-यांस भाग पडले आहे. काल संबंधाने पूर्वापरविरोधी अशी सदरचे ग्रंथकारांनी ग्रंथ जुळणीकरिता प्रचिन म्हणुन दिलेली वचने अभिनव असल्याचे व्यक्त करून दाखविण्याकरिता यत्न करणे आवश्यक झाले आहे. तीर्थे त्यांची माहात्म्ये व यात्राविधी बद्दल वर दर्शित केल्या प्रमाणे अनेक प्राचिन व अर्वाचीन ग्रंथ प्रचारात असल्याने व गोदाविवेका-दर्श व गोदा निर्णयचंद्रिकेत त्याबद्दलचे पाक्त व साधार विवेचन दिले असल्याने यात्राविधीची विशेषस्थले खेरीज करून ते होईल तितकेच संक्षेपाने दिले आहे. या लेखाद्वारे कुणाची उगीचच **निंदा** अगर **स्तुति** करण्याचा आमचा मुळ उद्देश नसुन विषयोपादन स्पष्ट व सुगमतर व्हावे इतकाचयाचा अभिप्राय आहे.

सध्या सिंहस्थ कुंभमेळ्याचे दिवस सुरू असल्याने गोदायात्रा खरोखर शास्त्रतः शक्य असेल तर कोठे झाली पाहीजे हे समजण्याकरिता हे विवेचन केले आहे. कालगतीने नविन ग्रंथ निर्माण करून यात्रेकरू लोकांची कशी गैरसमजुत करण्यात येते,हे दाखविण्याकरिता मराठी जाणणारे आबाल वृध्दास हे दिग्दर्शन केलेले आहे.

**ह्या** लेखात विसंगतपणा व प्रयोगरचना ह्यासंबंधी दोष होणे संभवनीय आहे,परंतु ते न होण्याविषयी शक्य तितका प्रयत्न केला आहे. तर मग वर दर्शित केलेले दोषांबद्दल कोणी निंदा केल्यास तिज विषयी कमीपणा वाटण्याचे भय अथवा कारण नाही असे आम्ही समजतो. 

**संकलन** व **शब्दरचना :-- भूषण सांभ शिखरे**(*पवईकर*)